**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १/२०१८ मध्ये निशाणी क्र. १४ वरील आदेश</u>**

(सुप्रिया विभुते व इतर वि. कविश विभुते व इतर)

<u>एमएचएसओ१२—०००१८—२०१८</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा शैलजा सुरेश माने हिला दिनांक २१/१२/२०१८ रोजी विक्री केलेला आहे. त्यामुळे शैलजा सुरेश माने हिला प्रतिवादीपणात सामील करून खरेदीखताबाबचा मजकूर दाव्यात नमूद करणे गरजेचे आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे देवून तिव्र आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा अर्ज खरा नसून कायदेशीर नाही. अर्जासोबत व्यवहाराची कागदपत्रे जोडलेली नाहीत. दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दिनांक २१/१२/२०१८ रोजी दावा मिळकतीमधील काही भाग शैलजा सुरेश माने यांना विक्री केल्याची बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. सदरचा दावा हा वाटपासाठी असल्याने खरेदीदार हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. सदरची दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मूळ स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्याचबरोबर प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. अर्ज नामंजुर झाल्यास पुढील गुंतागुंत वाढणार आहे व नविन दाव्याची उत्पत्ती होणार आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा गुणदोषावर निर्णय करण्यासाठी दुरुस्ती आवश्यकच ठरते. सबब, वरील बाबींचा विचार करता प्रस्तुत अर्जाचे कामी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये २००/— च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे मुदतीत दुरूस्ती करून घेण्याचे आहे.

**सही/—**

दिनांक— ०३/०८/२०१९

( संपुर्णा क. कारंडे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी

## CERTIFICATE

I affirm that contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shaikh A.G. Steno L.G. |
| Court | : | Jt. C.J.S.D., Barshi |
| Judgment / Order date | : | 03/08/2019 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 03/08/2019 |
| Judgment / order uploaded on | : | 05/08/2019 |